रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

## ता. पलूस, जि. सांगली

बुधवार, दि. 27 जानेवारी 2021

# मराठी विभाग

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त

### 'रानातल्या कविता' ऑनलाईन काव्यगायन कार्यक्रम

### अहवाल

मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने आयोजित 'रानातल्या कविता' हा कविता सादरीकरणाचा ऑनलाईन कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध ग्रामीण रानकवी नामदेव जाधव यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या ग्रामीण कवितांचे सादरीकरण केले. माती, शेती आणि माणूस यांच्यातील नाते उलघडवून दाखविणाऱ्या प्रादेशिक बोलीतील ग्रामीण जाणिवांनी भारलेल्या काव्यांचे सादरीकरण त्यांनी केले. ते पश्चिम महाराष्ट्रातील एक नामवंत कवी म्हणून प्रसिद्ध आहेत.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांनी भुषविले. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या ज्ञानक्षेत्रात करीयर करीत असताना त्याने स्वत:ला साहित्याबरोबर जोडून घेणे महत्त्वाचे आहे. जीवन अधिक प्रगल्भ करण्यासाठी साहित्य मोलाची मदत करीत असते. तसेच विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी भाषा समृद्ध करण्याचा कसोशीने प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन त्यांनी आपल्या अध्यक्षिय मनोगतातून व्यक्त केले. या सोहळ्यानिमित्त मराठी विभागातील माधुरी साठे हिने, तर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व प्रसिद्ध साहित्यिक संदिप नाझरे यांनी स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. यावेळी मराठी विभाग प्रमुख प्रा. दिलीप कोने यांनीसुद्धा स्वलिखित कविता सादर केली. उपप्राचार्य डॉ. विद्याधर पाटील, उपप्राचार्य डॉ. काकासाहेब भोसले महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत सदर कार्यक्रम संपन्न झाला. प्रास्ताविक प्रा. तेजस चव्हाण, सूत्रसंचालन प्रा. नम्रता कांबळे यांनी केले तर आभार प्रा. स्वाती मगदूम यांनी मानले.

**निष्पत्ती :** विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** ८५





विभागप्रमुख
मराठी विभाग

प्राचार्य
आर्ट्स सायन्स ॲण्ड कामर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)